सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३९ ▪ रविवार, दि. १५ जून, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १६ जून, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-39 ▪ Sunday 15 June, 2025 ▪ Postal Date 16 June, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## खदिजाह ईनामदार हिचे नीट परीक्षेत ५२४ गुणांसह घवघवीत यश



बीड (किसान न्युज): नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा नीट २०२५ मध्ये बीड शहरातील खदिजाह तुल कुब्रा नासेरोद्दीन ईनामदार हिने ५२४ गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या या यशात कुटुंबीयाचे मोठे योगदान असून, त्यांनी खदिजाहच्या अभ्यासात सातत्यानं पाठबळ दिलं. तिच्या यशामुळे संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण असून, तिचे मामा शेख एजाज, नातेवाईक व मित्रपरिवाराने देखील तिचे अभिनंदन केले आहे. खदिजाहच्या यशामुळे बीड शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात एक आदर्श निर्माण झाला आहे. नीटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घ्यावी, यासाठी तिचा प्रवास प्रेरणादायी ठरेल.

# एसपी साहेब, गोदापात्रात वाळू माफियांसोबत एका रात्रीचे बारा हजारा रुपये प्रति टिप्परने रेट ठरलेत; गेवराई, चकलांब्याच्या पोलिसांचे हातं बांधलेले म्हणूनच एलसीबीने जाऊन कारवाई केली

## स्थानिक प्रशासनाचा सुट्टा खेळ सुरु; गेवराई तालुक्यात एक हायवा वाळू ३५ तर बीडसाठी ४८ हजारात मिळते; पाडळसिंगीचा टोलनाका टाळून वाहतूक सुरु; सोशल मिडीयावर वाळू काढतानाचे व्हिडिओ व्हायरल

**बीड । किसान न्युज**

**गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन येथे गोदापात्रात राजरोसपणे अवैध वाळू उपसा सुरू असून, स्थानिक प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. यासाठी गेवराई आणि चकलांबा येथील एका रात्रीचा भाव ठरला असल्याची जोरदार चर्चा सुरू असून, बीड येथून जाऊन एलसीबी कारवाई करीत आहे पण स्थानिकांना याचा पत्ता लागत यातच सर्व आले. १० ते १२ हजार घेऊन त्यांना १२ तास मोकळे रान सोडण्यात येते. वाळू वाहतूक जोरदार सुरू झाली असून, फक्त पाडळसिंगीचा टोल नाका टाळून हा गोरखधंदा सुरू आहे. वाळू माफिया इतके निर्ढाले आहेत की, वाळू सुरू झाली हे लोकांना समजावे म्हणून फेसबुकवर वाळू काढतानाचे व्हिडिओ शेअर केले आहेत.**

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे अत्यंत अडचणीच्या काळात बीड जिल्ह्याची धुरा सोपविण्यात आली. हा काळ म्हणजे एकप्रकारे आव्हानच होते. पण कॉवत यांनी हे आव्हान पेलले आणि प्रथम बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडण्यासाठी जिल्ह्यातील अवैध धंदे टार्गेट केले. यात गुटखा, मटका, दारु यावर कारवाई करुन बऱ्यापैकी यश मिळविले आहे. पण वाळू हा मोठा अवैध धंदा आहे. यातून मोठे अर्थकारण आणि त्यातून गुन्हेगारीत वाढ हे लक्षात येताच त्यावर लक्ष केंद्रित करुन वाळू माफियांना सळो की, पळो करुन सोडले.इतकेच नव्हे तर अनेक वाळू माफियांना पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून हजेरी घेऊन त्यांच्याकडून बाँड लिहून घेतले आहे. कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. यामुळे अनेकांनी आपले हायवा जागेवर उभे केले तर काहींनी इतर ठिकाणी कामाला लावले आहेत. परंतु शासनाने घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळू



देण्याचा निर्णय घेतला असून, अनेक घरकुल मंजूर झाले त्यामुळे वाळू मोफत देण्यास सुरुवात केली होती. हा सांधा » पान २ वर

### शासन देणार रॉयल्टीची रक्कम


घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. पण आता हा निर्णय फिरवला गेला असून, शासन आता घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू साठी लागणारी रॉयल्टी रक्कम देणार असल्याची चर्चा आहे. अन् सध्या ५ ब्रास वाळू तालुक्यात घ्यायची असेल तर ३५ हजार मोजावे लागतात तर ही रक्कम म्हणजे नेमकी किती देणार असा प्रश्न असून, जर ३ हजार रुपये दिले तर हा प्रकार म्हणजे 'जिराफच्या तोंडात जिरा' असा ठरेल.



## राक्षसभूवन मध्ये वाळूवर एलसीबीची कारवाई; १७ लाखांचा मुद्येमाल जप्त



बीड (किसान न्युज): राक्षसभूवन येथे नदीपात्रात छापा टाकून अवैध वाळू उपसा करताना दोन ट्रॅक्टर, सह आदी साहित्य असा १७ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे राक्षसभूवन येथे अवैध वाळू उपसा सुरू आहे यावर शिक्कामोर्तब झाले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. वाळू धोरण जाहीर झाले असले तरी बीडमध्ये अद्याप वाळू घाटांचे लिलाव झाले नाही. यामुळे वाळू उपसा बंद आहे. वर्ष झाले वाळू बंद असल्याने अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. तरीही राक्षसभूवन भागात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची जोरदार चर्चा होती. याच आधारे स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी (दि.१४) रात्री राक्षसभूवन येथे नदीपात्रात छापा टाकला असता येथे दोघे जण अवैध वाळू उपसा करताना मिळून आले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेने दोन ट्रॅक्टर , लोडर, ट्रॉली असे १७ लाख ६ हजारांचे साहित्य जप्त केले. तसेच आरोपी अक्षय पोटफेडे व करण » पान २ वर



## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मस्साजोग मध्ये पुन्हा आंदोलनाचा इशारा

**बीड । किसान न्युज**

संतोष देशमुख कुटुंब आपला लढा तीव्र करणार असून संतोष देशमुखांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे. संतोष देशमुख यांच्या कन्या वैभवी देशमुख हिने उद्या सोमवार १६ जूनपासून मस्साजोग गावात रस्त्यावर ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भातील निवेदन धनंजय देशमुख यांनी तहसीलदारांकडे सादर केले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येला जवळपास सहा महिने पूर्ण झाले आहेत. या प्रकरणातील प्रमुख आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. दुसरीकडे, अटकेत असलेल्या अन्य आरोपींना तुरुंगात व्हीआयपी सुविधा मिळत असल्याचा आरोपही देशमुख कुटुंबाने केला आहे. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा देशमुख कुटुंब न्यायासाठी रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे.



बीड : शहरापासून काही अंतरावर बार्शी रोडवरील ऐतिहासिक ठिकाण खजाना बावडी कडे जाणारा रस्ता चिखलात हरवला आहे. दरवर्षी शेकडो पर्यटक या ठिकाणी भेट देतात पण येथील रस्ताही अद्याप पक्का होऊ शकला नाही. यामुळे विकासाच्या पोकळ गप्पा मारणारे पुढारी पहिल्याच पावसात उघडे पडले. चिखलात हरवला आहे.

### विमान दुर्घटनेची राख विजली नाही

## तोच हेलिकॉप्टर क्रॅश होऊन सात जण ठार

**दिल्ली । वृत्तसंस्था**

उत्तराखंड राज्यातील रूद्रप्रयाग जिल्ह्यात आज रविवारी पहाटे झालेल्या भीषण हेलिकॉप्टर दुर्घटनेत यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील एकाच कुटुंबातील तिघेजण ठार झाले. राजकुमार जयस्वाल (४२), श्रद्धा जयस्वाल (३४) आणि काशी जयस्वाल (२) सर्व रा. वणी अशी मृतांची नावे आहेत. जयस्वाल कुटुंबीय अन्य नातेवाईकांसोबत चारधाम यात्रेकरीता गेले होते. मात्र या दुर्घटनेत पती, पत्नी आणि मुलीचा मृत्यू झाल्याने जयस्वाल कुटुंबावर आभाळ कोसळले आहे. यात एकूण सात जण ठार झाले आहेत. रूद्रप्रयाग जिल्ह्यातील गौरीकुंड येथे आज पहाटे खराब हवामानामुळे हे हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. त्यात वणीतील जयस्वाल कुटुंबातील तिघांचा समावेश आहे. या अपघातातील बहुतांश मृतक हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. हे सर्व भक्त आज पहाटे केदारनाथ दर्शनासाठी हेलिकॉप्टरने » पान २ वर

## बीडमध्ये एन.के.कॉलनीत डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते विकासकामांचे उद्घाटन

**बीड । किसान न्युज**

दि.१५ : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीड शहरातील पेठ बीड येथील एन.के.कॉलनीत रविवारी (दि.१५) स्थानिक निधीतून झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. या कामांमध्ये ओपन स्पेसमधील उद्यान, कंपाऊंड भिंत, मंदिर परिसराची सुशोभीकरण अशी कामे समाविष्ट आहेत. यावेळी नागरिकांशी थेट संवाद साधताना



डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले की, या भागाच्या विकासासाठी स्थानिक निधीतून कामे झाली असली तरी येणाऱ्या काळात शासनस्तरावर देखील पाठपुरावा करून अधिक निधी आणण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. या कार्यक्रमाला नगरसेवक प्रेम चांदणे, ॲड.विकास जोगदंड, रामसिंग टाक, अमर डागा, ओमप्रकाश तोतला, » पान २ वर

## मनसेचे राज ठाकरे यांचा वाढदिवस बीडमध्ये साजरा

### देवाने तुमची सेवा करण्यासाठी निवडलं, हेच आमचं खरं भाग्य : वर्षा जगदाळे

**बीड । किसान न्युज**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडमधील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक » पान २ वर








## विद्यार्थ्यांना शाळेतच मिळणार एसटीचे पास परिवहन मंत्री सरनाईकांची घोषणा



**मुंबई । किसान न्युज**

शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आता विद्यार्थ्यांना एसटीचे पास शाळेतच मिळणार आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली आहे. विद्यार्थ्यांना पास काढण्यासाठी एसटी डेपोत जाण्याची गरज नाही. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. १६ जून २०२५ पासून याची अंमलबजावणी होणार आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले, नवीन शैक्षणिक वर्षातील शाळा १६ जूनपासून सुरू होत आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी एसटीच्या माध्यमातून ६६.६६ » पान २ वर

**पाहिजेत**

अनुभवी मॅनेजर व रूम बॉय नाईट साठी हॉटेल हिना लॉज जालना रोड बीड

Mob : 9325343615

**स्थानिक सोने चांदीचे भाव..**

**पंकज ज्वेलर्स**

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058

सोने २४ कॅरेट 98,500

२२ कॅरेट 96,500

चांदी प्रतिकिलो 108,000